# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २१/०२/२००६
## (दि. १४/०२/२००६ रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. १४/०२/२००४ रोजीची कोरम अभावी तहकुब झालेली स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २१/०२/२००६ रोजी सभा सुचना क्र. २६ दि. ०८/०२/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ११) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १२) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १३) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महानगरपालिकेचे अधिकारी वर्ग आणि महानगरपालिका कर्मचारी वर्ग. मी या ठिकाणी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. आपल्याला या ठिकाणी प्रशासनाने अंदाजपत्रक दिलेले आहे आणि आपण हे अंदाजपत्रक स्विकारायचे आहे. त्यासाठी खास करून ही सभा आयोजित केलेली आहे.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१० चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्त साहेब मा. सभापती साहेबांना बजेट सादर करतील.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २११ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

परिवहन सेवा समितीचे अंदाजपत्रक परिवहन समितीचे सभापती श्री. शांताराम ठाकूर स्थायी समिती सभापतींना सादर करित आहेत.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीचे मा. सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, उपस्थित अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग, सन २००५-०६ चे सुधारित व सन २००५-०६ चे मूळ अंदाजपत्रक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. संस्थेची अर्थव्यवस्था पाहता मागणी व पुरवठा यामधील अंतर वाढत असुन शहर सौंदर्यीकरण, औद्योगिकीकरण व नागरी सुविधांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. याकरिता उत्पन्नाची बाजू अत्यंत महत्त्वाची आहे. त्याच्यामधील वाढ व घट यांचा विचार करणे तितकेच महत्वाचे आहे.

आपण महत्वाकांक्षी योजना राबवित आहोत. त्याच्यामध्ये नागरी सुविधांच्या योजनांची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे. संगणकीकरणामुळे लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी नागरी सुविधा केंन्द्र सुरू करण्यात आलेले आहे. त्यामुळे लोकाभिमुख प्रशासनाची गती झपाट्याने वाढेल हे काळाच्या ओघात सर्वांच्या लक्षात येईल. वरिल पार्श्वभुमिवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ९५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००५-०६ चे सुधारित व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक आणि अधिनियमाच्या कलम ९५(अ) प्रमाणे अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवाबाबतचा सन २००४-०५ चा अहवाल सादर करित आहे. अर्थसंकल्पातील उत्पन्नाच्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत. मालमत्ता करापासून रू. ३५.५१ कोटी अपेक्षित आहेत, जकात करापासून रु. ६३.८३ कोटी अपेक्षित आहेत, पाण्यावरील कर रू. २० कोटी अपेक्षित आहेत, विषेश शिक्षण करापासून रू. ०.८४ कोटी मिळणार आहेत, विकास कर रु. ८ कोटी मिळणार आहे, बाजार फी रू. १ कोटी ६५ लाख मिळणार आहेत, नवीन नळ जोडणी रू. साडे तीन कोटी अपेक्षित आहेत, अग्निशमन सेवा करापासून रू. ०.८४ कोटी मिळणार आहेत, वृक्षकर रू. १.४४ कोटी मिळणार आहेत, आपण रू. ८३ कोटीची कर्ज उभारणी करणार आहोत. खर्चाच्या ठळक बाबी पुढिलप्रमाणे आहेत. विकास आराखड्यातील नवीन रस्ते रू. ५६.५० कोटी, भुयारी गटार योजना रू. २५ कोटी, भाईंदर पूर्व-पश्चिम सब-वे रू. १० कोटी, घनकचरा व्यवस्थापन रू. ४.३५ कोटी, नवीन जलवाहिनी टाकणे रू. ५ कोटी, परिवहन सेवा रू. ३.३५ कोटी, नवीन गटारे रू. ३.५० कोटी, संगणकीकरण रू. ०.७५ कोटी, नवीन फायर फायटर खरेदी रू. १ कोटी, नवीन हॉस्पिटल रू. १.८५ कोटी, वृक्ष प्राधिकरण रू. १.९५ कोटी महापालिका क्षेत्रातील संवर्धन व संरक्षण करणे. सामाजिक वनीकरण व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष संवर्धन समित गठित करण्यात आलेली आहे. याकरिता रु. १ कोटी ९५ लाखाची तरतुद अंदाजपत्रकात करण्यांत आलेली आहे. या निमित्ताने वृक्षप्राधीकरण समितीचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. आरक्षणातील रस्ते विकासीत करणे, महासभेने मंजुर केलेले डी.पी. रोड प्राधान्य क्रमांकानुसार विकसीत करण्याकरीता अर्थसंकल्पामध्ये कर्जरुपाने अधिक महानगरपालिका हिस्सा अशी एकुण रू. ५२ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक विभागवार तरतुद अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे. आपण अर्थसंकल्पामध्ये सन २००६-०७ या आर्थिक वर्षात महापालिका क्षेत्राचा सर्वांगिण विकास करणे व जास्तीत जास्त नागरी सुविधा पुरवून लोकाभिमुख प्रशासन देण्याचा मानस आखलेला आहे. प्रशासन व सन्मा. सदस्य यांच्यात सुसंवाद साधून अर्थसंकल्प योग्य स्वरूपात आणण्यासाठी प्रशासन प्रयत्नशिल राहील. याकरिता सन्मा. सदस्यांचे सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो. मी या अंदाजपत्रकाबाबत जे दोन शब्द सांगितलेले आहेत ते संपवतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

**प्र. सचिव :-**

परिवहन सेवा समितीचे मा. सभापती परिवहन सेवेच्या बजेटबाबत त्यांचे मनोगत व्यक्त करित आहेत.

**मा. सभापती (परिवहन समिती) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम सन २००५-०६ चे सुधारित आणि सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सन्मा. स्थायी समितीचे मा. सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब, स्थायी समितीचे सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मा. आयुक्त साहेब, महानगरपालिका अधिकारी वर्ग आणि महानगरपालिका कर्मचारी वर्ग मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९७(क) अन्वये मा. आयुक्त साहेबांनी परिवहन सेवा समितीला सादर केलेल्या प्रथम अंदाजपत्रकात आवश्यक ते बदल करून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९८(३) नुसार पुढिल मंजुरीसाठी आपणास सादर करताना अतिशय आनंद होत आहे. मिरा भाईंदर शहरास परिवहन सेवा देण्याचे स्वप्न पुर्णत्वास आणण्यासाठी मला ज्यांचे सहकार्य लाभले त्याच्यामध्ये मा. पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेब, प्रथम नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेंन्डोसा साहेब, मा. आयुक्त साहेब, परिवहन सदस्य, महानगरपालिकेतील नगरसेवक, नगरसेविका आणि महानगरपालिका अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग यांचे मी प्रथम आभार मानतो. परिवहन उपक्रम १०० टक्के खाजगीकरणाच्या माध्यमातुन सुरू करून सद्यस्थितीत परिवहन सेवेमार्फत मिरा भाईंदर शहरातील अंतर्गत बारा मार्गावर तीस गाड्यांच्या सहाय्याने बससेवा पुरवीण्यात येत आहे. तसेच शहरातील नागरीकांसाठी बोरिवली, ठाणे, वसई, विरार, बससेवा सुरू करण्यासाठी शासनाकडून परवानगी घेण्याचे काम चालू आहे. उपक्रमाच्या बस गाड्यांना पार्किंग करण्यासाठी परिवहन उपक्रम म्हणजेच मानंकर आय.एस.ओ. प्रमाणित करण्याबाबत ही कार्यवाही प्रस्तावित करण्यांत येत आहे. त्यामुळे सन २००६-०७ च्या अंदाजपत्रकात भांडवली निधीची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच, परिवहन सेवेचा दर्जा व गुणवत्तेमध्ये वाढ होईल. सन २००५-०६ च्या सुधारित अंदाजपत्रकात रू. ४ कोटी २२ लाख उत्पन्न व खर्चाचे ढोबळमनाने अंदाज निच्छित केलेले आहेत. सन २००६-०७ च्या मुळ अंदाजपत्रकात रू. १२ कोटी १२ लाख उत्पन्न खर्चाचे अंदाज धरण्यात आलेले आहेत. मी सदर अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केलेले असुन मला मा. सभापती व सन्मा. सदस्यांचे याकामी सहकार्य लाभेल अशी मी आशा बाळगतो. आपल्या सर्वांचे परिवहन सेवा चालू राहण्यासाठी मोलाचे सहकार्य प्राप्त झालेले आहे असे सहकार्य यापुढेसुद्धा लाभेल अशी मी आशा बाळगतो. अपणा सर्वांनी मला सहकार्य दिल्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो आणि सर्वांचे आभार मानतो. जय हिंन्द जय महाराष्ट्र.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब तथा प्रशासन आणि परिवहन सेवा समितीचे मा. सभापती यांनी दि. २१/०२/२००६ रोजी अंदाजपत्रक मा. स्थायी समितीला सादर कलेले आहे. प्रशासनाने या अंदाजपत्रकामध्ये मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी चांगले पाउल उचलले असेल व शहरातील करदात्यांवर कुठल्याही प्रकारचा वाढीव बोजा लागणार नाही याची प्रशासनाने नक्कीच काळजी घेतलेली असेल अशी मी आशा बाळगतो आणि हे अंदाजपत्रक स्विकारतो. त्याच्याप्रमाणे मी सर्व अधिका-यांचे हार्दिक स्वागत करतो. मिरा भाईंदर स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, प्रशासनाचे सर्व अधिकारी यांना मी सांगू इच्छितो की जर तुम्हाला या बजेटवर सुधार करायचा असेल तर तुम्ही याची निश्चित तारिख ठरवून पुढील विचार करू. आपण सर्वांनी या शहराचा विकास करण्यासाठी आणि शहराचा कायापालट करण्यासाठी चांगले विचार द्यावे अशी अपेक्षा करतो. मिरा भाईंदर शहर मुंबईलगत असल्यामुळे मिरा भाईंदर शहराचा विकास झपाट्याने वाढत आहे. आपल्याकडे ब-याच प्रमाणात वाढ होत आहे. अशी वाढ होत असताना आपण आपले पाउल पुढे टाकले पाहिजे. जेणेकरून आताच्या पाईपलाईनमध्ये १०० एम.एल.डी. पाणी वाढलेले आहे. आपण अधिका-यांशी चर्चा केल्यानंतर त्याच पाईपलाईन मधून आताच २५ एम.एल.डी. पाणी वाढवून घेता येईल अशा त-हेने मी व आपले सर्व सहकारी मंत्री महोदयांना भेटून आपल्या सर्वांच्या सहकार्याने त्याच्यामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करणार आहोत. अशारितीने या शहराचा कायापालट करताना आपल्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. अ, ब, क कॉलमची एकुण रू. २८१ कोटी आहे, खर्च २८० कोटी आहे आणि रू. १ कोटी शिल्लक राहणार आहेत अशा रितीचे हे अंदाजपत्रक आहे. आपल्याला या अंदाजपत्रकामध्ये जी काही माहिती पुरवायची असेल आपण त्याच्यासाठी पुन्हा सभा घेणार आहोत. आपण सर्वांनी आतापर्यंत चांगले सहकार्य केलेले आहे. मी तुमच्याकडून या सहकार्याची अपेक्षा बाळगतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो. जय हिंन्द जय महाराष्ट्र.

**प्र. सचिव :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की मा. आयुक्तसाहेबांनी सन २००५-०६ चे सुधारित व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक सादर केलेले आहे. परिवहन उपक्रमाचे सन २००५-०६ चे सुधारित अंदाजपत्रक आणि सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक परिवहन सेवा समितीचे मा. सभापतींनी सादर केलेले आहे. वृक्ष प्राधिकरण समितीचे सन २००५-०६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक मा. आयुक्त साहेबांनी सादर केलेले आहे. आता तिन्ही बजेट सादर झालेली आहेत आणि ही तिन्ही बजेट मा. सभापतींनी स्विकारली आहेत. सादर बजेटवर चर्चा करण्यासाठी दि. २३ फेब्रूवारी आणि २४ फेब्रूवारीची तारिख निश्चित केलेली आहे. कारण आपले बजेट दि. २० मार्च रोजी मंजुर व्हायला पाहिजे. दि. २० मार्चला बजेट मंजुर होण्यापूर्वी महानगरपालिकेच्या प्रत्येक सदस्याच्या हातात दहा दिवसापुर्वी बजेटची कॉपी जायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

बजेटवर दोन दिवसात चर्चा होणार नाही.

**मिलन पाटील :-**

बजेटवर चर्चा करण्यासाठी कमीतकमी चार दिवसांच्या मुदतीची आवश्यकता आहे. कारण ह्याच्यामध्ये मा. आयुक्त साहेबांनी दिलेला इष्टांक पार केलेला नाही. त्यामुळे या बजेटला चार दिवसाची मुदत आवश्यक आहे. हे बजेट प्रत्येक डिपार्टमेंटचे घ्या कारण ही डिपार्टमेंटची जबाबदारी आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण गेल्या वर्षी बजेटवर चार दिवस चर्चा केलेली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

गेल्यावर्षी बजेटवर बारा बारा तास चर्चा केलेली होती.

**प्र. सचिव :-**

आपण दि. २३ फेब्रूवारी किंवा दि. २४ फेब्रूवारीची तारिख निश्चित करा.

**मा. आयुक्त :-**

बजेटवर जास्त वेळ चर्चा केली तरी आमचा त्याला विरोध नाही. चर्चा झाल्यानंतर प्रशासनाकडे थोडासा कालावधी आवश्यक आहे जेणेकरून तुमच्या ज्या काही सुचना असतील आपल्याला त्या सुचना त्याच्यामध्ये इन्कार्पोरेर्ट करुन बजेट सादर करायचे आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सन २००५-०६ चे अंदाजपत्रक प्रशासनाने मा. सभापती महोदयांकडे सादर केलेले आहे. एकूण रू. २८१ कोटीचे बजेट मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे परिवहन सेवा समितीचे मा. सभापती यांनी रू.१२ कोटी १२ लाखाचे अंदाजपत्रक या ठिकाणी सादर केलेले आहे. वृक्षप्राधिकरण रू. १ कोटी ९५ लाखाचे बजेट सादर केलेले आहे. मी प्रशासनाला धन्यवाद देतो. कारण या ठिकाणी गेली तीन वर्षे अंदाजपत्रक सादर होत होते या ठिकाणी हे चौथे अंदाजपत्रक सादर होत आहे. या ठिकाणी प्रशासनाने चांगली खबरदारी म्हणून मागील बजेटचा आढावा देउन अंदाजपत्रक दिलेले आहे. वरच्या वर बघितल्यानंतर याठिकाणी बरीच तफावत दिसत

आहे. त्याकरिता या सदनाच्या सर्व सन्मा. सदस्यांना मी विनंती करतो की आपण ज्याप्रमाणे मॅरेथॉन स्पर्धा भरवतो त्याप्रमाणे या बजेटमध्ये मॅरेथॉन चर्चा झाली पाहिजे. मागच्या वेळेला ती तफावत झालेली होती तशी तफावत होता कामा नये अशी आपण सर्वांना खबरदारी घ्यायची आहे. प्रशासनाने आपले काम केलेले आहे. परंतू, ते काम करित असताना आपण मागचे तीन बजेट बघितल्यानंतर नेहमी प्रत्येक बजेटमध्ये अशी तफावत येत असते. अशी तफावत येता कामा नये मा. आयुक्तसाहेब या कामी प्रशासनाचे सहकार्य लाभले पाहिजे. दर महिन्याला आपण या बजेटच्या अंदाजपत्रकावर चर्चा घडवून आणली पाहिजे. विकासाच्या कामाचे अनेक विषय असतात. विकासाच्या कामाच्या विषयावर चर्चा करित असताना आपल्याला वेळ फार अपुरा पडतो. परंतू, मुळ अर्थसंकल्पातुन आपल्याकडे भरीव रकमा जमा होणे आवश्यक आहे. अनेक कराच्या रूपाने अनेक रकमा जमा होणे आवश्यक आहे. आपण ह्या रकमा कशा पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचवू शकू आपण अशा पद्धतीने काम केले पाहिजे. कारण आमची महानगरपालिका नव्याने प्रस्तावित होउन आम्हाला तीन वर्षे झालेली आहेत आणि चौथे वर्ष सुरू आहे. आम्हाला या कामी अधिका-यांचे फार मोठे सहकार्य लाभेल अशी अपेक्षा बाळगतो. कारण कोणत्याही विकासाच्या कामामध्ये सदस्यांनी दिलेला प्रस्ताव आजतागायत या सदनामधून परत गेलेला नाही ही या सदनाची ख्याती आहे. चर्चेअंती सदस्य आपल्याशी जरूर मतभेद करित असतील. परंतु, कोणतेही मतभेद न करता सदस्य या शहराचा विकास करित आलेले आहेत. या शहराचा भरिव विकास झालेला आहे. यापुढे या शहराचा विकास होईल अशी मी सर्वांच्या वतीने आशा बाळगतो आणि मा. सभापतींच्यावतीने सभागृहाला आश्वासन देउ इच्छितो की आपण या अंदाजपत्रकाप्रमाणे दिलेल्या रकमा परिपूर्ण होतील. आम्हाला यांच्यावर अजून कुठले सोर्सेस मिळत असतील तर आम्ही ते सोर्सेस तुमच्यासमोर ठेवू. आपण सर्व त्यासाठी सहकार्य द्याल अशी आशा बाळगतो. आपण मिरा भाईदर महानगरपालिकेचा चौथा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. हा अर्थसंकल्प मा. सभापती साहेबांनी स्विकारलेला आहे. प्रत्येक घटकांनी हा अर्थसंकल्प स्विकारलेला आहे. आपल्याला प्रत्येक घटक त्याच्या पद्धतीने सहकार्य करतील आम्हाला परिवहन समितीच्या मा. सभापतींना जे विशेष सहकार्य देता येईल आम्ही ते सहकार्य परिपूर्णरित्या देउ. कारण तुम्ही कमी बजेटमध्ये ही परिवहन सेवा सुरू केलेली आहे. परिवहन सेवा सुरू करित असताना महासभेने, त्या सन्मा. सदस्यांनी आपल्याला अतोनात सहकार्य केलेले आहे. कारण आपल्याला कोणताही प्रयोग करित असताना याठिकाणी तुट आणि नुकसानाचा प्रश्न समोर येतो. परंतु, त्याची तमा सदनाच्या कोणत्याही सदस्यांनी बाळगलेली नाही. महासभेत आलेले प्रश्नसुद्धा आम्ही आमच्या परिने सोडवलेले होते. त्याच्यापुढे वसई, विरार या सर्व ठिकाणी परिवहन सेवा तसेच बोरिवली, ठाणे आणि अन्य ठिकाणी या सेवा सुरू झाल्या पहिजेत आपण या बजेटबाबत बोलताना आम्हाला सांगितलेले होते आम्ही तुम्हाला याबाबत सहकार्य करू हे सहकार्य केल्यानंतर मिरा भाईंदर पॅटर्न राहिल. कारण संपूर्ण देशामध्ये खाजगीकरण करणारी ही एकमेव महानगरपालिका आहे. आज या पॅटर्नचे मिरा भाईंदर पॅटर्न असे नाव संपूर्ण देशामध्ये राहणार आहे. या नावासाठी आपण आपल्या पद्धतीने चांगले कार्य केले तर मिरा भाईंदर महानगरपालिकेचा गौरव होईल. आपण त्यासाठी प्रयत्न केले आणि या सदनाने त्याला वेळच्या वेळी सहकार्य केले तर योग्य होईल. हे सदन यापुढे असेच सहकार्य करिल अशी मी आशा बाळगतो आणि तुम्हाला पुढील कार्यासाठी शुभेच्छा देतो. सर्व सन्मा. सदस्य बजेटवर सखोल अभ्यास करून बजेट पूर्ण करतील. यापुढे कुठल्याही पद्धतीची त्र्रुटी किंवा कुठलेही नुकसान होणार नाही याची खबरदारी घेउ मी एवढेच या ठिकाणी माझ्या वतीने बोलतो धन्यवाद. जय हिंन्द जय महाराष्ट्र.

**रतन पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, हुशार आणि सगळ्यात तरबेज असणारे आमचे मित्र सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सन २००२-०३, सन २००३-०४, सन २००४-०५ या मागील अंदाजपत्रकांचा चांगल्या पद्धतीने आढावा दिलेला आहे. एवढी तुट आहे असे त्यांनी पद्धतशीररित्या सांगितलेले आहे ही तुट कशामुळे झालेली आहे? ते बघा. स्थायी समितीच्या या सभापतीने केलेले अंदाज सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी फुगवलेले आहेत. मा. आयुक्त साहेबांचे अंदाज आणि मा. सभापतींनी केलेल्या अंदाजामध्ये भरपुर तफावत आहे. स्थायी समितीच्या अध्यक्षांनी जी तफावत दाखवलेली आहे ही तीन वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये रू. १५० कोटी तफावत आहे. ही तफावत कशाला करता? हे बजेट मागच्या वेळेला कशाला फुगवले गेले? कारण या बजेटची चर्चा होणारच आहे. परंतु, आा सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे मी त्याबाबत खुलासा करित आहे. आपल्याला ज्या ज्या पद्धतीने आणि जिथुन जिथुन पैसे मिळालेले नाहीत त्याची जबाबदारी माजी मा. सभापतींची नव्हती का? मा. आयुक्त आणि प्रशासनाची जबाबदारी नव्हती का? त्याचा पाठपुरावा का केला गेलेला नाही? ते पैसे का वसुल झालेले नाहीत? आपल्याला एवढे पैसे मिळणार आहेत अशा त्याच्या उत्पन्नाच्या नोंदी केल्या गेलेल्या आहेत का? त्या अनुषंघाने त्यांनी कामे काढलेली आहेत तुम्ही आम्हाला मागचे बजेट दाखवा. आता जी कामे पास केलेली आहेत. ती सर्व कामे पुढच्या बजेट मध्ये येतील. पुढच्या बजेटमध्ये कोणाचीही कामे निघणार नाहीत. तुम्ही फुगिर बजेट करु नका. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वास्तविक अंदाजपत्रक करा. येणा-या जमेच्या बाजु आणि खर्चाच्या जमेच्या बाजु बघा आपल्याला अवास्तव खर्च झालेला आहे. आपण हा खर्च पुढच्या बजेटमध्ये बघु. मी सर्व

सन्मा. सदस्यांना विनंती करतो की ज्या तीन अंदाजपत्रकामध्ये जी तुट निघालेली आहे त्याबाबत तुम्ही या सदनाचे सन्मा. सदस्य आहात त्यामुळे तुम्ही त्याच्यावर विचार करणार आहात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील तुम्हाला बजेटवर चर्चा करण्यासाटी चार दिवस मिळणार आहेत त्यामुळे तुम्ही आता बजेटवर चर्चा करू नका. आता बजेट स्विकारलेले आहे. आपण ह्या बजेटवर चर्चा करणार आहोत.

**रतन पाटील :-**

आपण बजेटवर चर्चा नंतर करणार आहोत म्हणन मी विनंती करतो की अशा पद्धतीने वाढीव बजेट न करता आपण प्रत्यक्ष अंदाजपत्रक तयार करुया. परिवहन सेवा समितीच्या मा. सभापती, मा. आयुक्त साहेब व स्थायी समितीच्या मा. सभापतींचे स्वागत करतो. आपल्या स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांनी ते बजेट स्विकारून त्याच्यावर चर्चा करण्याचे गृहीत धरलेले आहे. त्यामुळे मी त्याचे सुद्धा स्वागत करतो. धन्यवाद.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, मा. आयुक्त, मा. परिवहन सभापती ह्यांनी सन २००५-०६ चे सुधारीत व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक सादर केलेले आहे. तसेच परिवहन सेवा समितीचे सन २००५-०६ चे सुधारित आणि सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे. वृक्ष प्राधिकरण सेवा समितीचे सन २००५-०६ सुधारित व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे. आपले बजेट मागच्या अंदाजपत्रकापेक्षा थोडे वाढलेले आहे. आपण मागच्या वेळेला कमीत कमी चार ते पाच दिवस चर्चा केलेली होती. मी सचिव आणि मा. सभापतींना सांगतो की, या चर्चेसाठी कमीत कमी सहा ते सात दिवसांचा कालावधी मिळावा जेणेकरुन चर्चा व्यवस्थितपणे होईल आपल्याला इथे पैसे येण्याचे सोर्सेस असतात. जसा आपला ऑक्ट्रॉय नाका आहे. त्या ऑक्ट्रॉय नाक्यावर त्यांनी आपल्याला वसुलीबाबत दिलेले आहे. परंतु, त्यांनी त्यापेक्षा कीतीतरी पटीने वसुली केलेली आहे. आपल्या महापालिकेकडे त्याचा भरणा होतो की नाही हे आपण बघितलेले नाही. एकेका सदस्याकडे टॅक्समधून वसूल केलेल्या कमीतकमी रू १० लाख ते रू १५ लाखाच्या पावत्या असतील. माझ्या कडे रू. १२ लाख ते रू. १३ लाखाच्या पावत्या वसूल केलेल्या मी तुम्हाला दाखविन. आपल्या महापालिकेकडे तो टॅक्स जमा होतो की नाही ते माहिती नाही. या अंदाजपत्रकात रू. १५ लाख टॅक्स वसुली दाखवलेली आहे. आपल्याकडे दुसरा सोर्स बिल्डींगचा आहे. आपण जो कर भरतो आपल्याकडे विकास चार्ज येत नाही. तुम्ही याचे नक्की कारण शोधून काढा. कारण बिल्डीग तयार होतात. आपण प्रत्येकवेळेला सांगतो कीहा बोर्ड लागला पाहिजे तो बोर्ड लागला पाहिजे. कुठलेच बोर्ड लागत नाही. बिल्डींग सर्रास चालू आहेत. बिल्डींग मोजुन किती विकासकर येतो याचा आपल्याला विचार करायचा आहे. कारण बांधकाम पुष्कळ वाढलेले आहे. मा. आयुक्तसाहेबांनी आपल्याला मधल्या काळात सांगितलेले होते. परंतु, तरीसुद्धा आतादेखिल सर्व्हिस रोडच्या बाजुला अनधिकृत बांधकामे चालू आहेत. आज सकाळीपण आपण अनधिकृत बांधकामे थांबवत होतो. तरिसुद्धा अनधिकृत बांधकामे चालू आहेत. नक्की काय ते समजत नाही आपल्याला अजुनपर्यंत पाच सहा दिवस चर्चा करायची आहे. स्थायी समितीचे मा. सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे आणि परिवहन सेवा समितीच्या मा. सभापतींनी बजेट सादर केलेले आहे आम्ही तुम्हाला नक्कीच सहकार्य करू. तुम्ही आम्हाला सहकार्य करा जेणेकरून भाईंदरच्या नागरीकांना ते सोयीस्कर होईल. एवढे आमचे म्हणणे आहे.

**प्रभात पाटील :-**

मला मा. आयूक्त साहेबांना एक शंका विचारायची आहे. महिलांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे पाणीपुरवठ्याचा विषय आहे. तुम्ही पाणीपट्टीमध्ये कुठल्याही प्रकारची वाढ सुचवलेली नाही. मी त्याबद्दल तुमचे अभार मानेन. मी बजेटवर चर्चा करणार नाही. तुम्ही बजेट सादर केलेले आहे आणि विविध पक्षांच्या सहकाऱ्यांनी बजेट स्विकारलेले आहे. परंतु, महिलांचा एक जिव्हाळ्याचा विषय म्हणून मी बोलते. महिलांना पाण्यावर जास्त कराची आकारणी नको असते. गॅस, सिलेंडर हे आपल्या चर्चेचे विषय नाहीत. तुम्ही महिलांना एक दिलासा दिलेला आहे मी त्याबद्दल तुमचे आभार मानते. ज्या विषयांमुळे महिला वर्गांना हाल सहन करावे लागतात मी त्याच विषयावर बोलणार आहे. महापालिकेत हाउस टॅक्सचा एक विषय येउन गेलेला होता. तो विषय सर्वांना समान कर लादण्याबाबत होता त्या विषयाचे कुठेही इम्लिमेंटेशन झालेले नाही. तुम्ही त्या विषयाला पूर्णविराम द्यावा. सर्वांना समान कर लावून तुम्ही या विषयाची अंमलबजवणी करावी हा एक विषय झाला. परिवहन सेवा समितीच्या मा. सभापतींना अशी विनंती आहे की, तुम्ही तुमच्या परिवहन सेवेमध्ये महिलांना बसण्याची आरक्षित जागा मेन्शन करावी. दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही अपंग महिला आणि विद्यार्थ्यांच्या तिकीट दरात सुट द्यावी. आता महिला व बालकल्याणाचा विषय बाकी राहीलेला आहे मी त्याबाबत असे सांगेन की, आपण आपल्या अंदाजाच्या म्हणजे आपण बजेटच्या पाच टक्के एवढी तरतुद करित असतो. परंतू, महिलांसाठी जे प्रलंबित विषय आहेत त्याबाबत सगळ्याच महिलांना कर्ज वाटप होत नाही. आपण पाच टक्के रक्कम ठेवतो. परंतु, किती महिलांना कर्ज मिळतात? मी या विषयावर नेहमीच बोलत असते. आपल्याकडे कर्ज देणाऱ्या बँका आकृष्ट होत नाहीत किंवा महिलांना कर्ज देत नाही. आपण ह्या पाच

टक्क्यामधून जी रू. ३५ लाखाची तरतुद संपत नाही. आपण त्या समितीला अजुनपर्यंत पॉवर्स दिलेल्या नाहीत. जर आपल्याला एवढी तरतुद करायची असेल तर आपल्याला महिला व बालकल्याण समितीला पॉवर्स सुपुर्द कराव्या लागतील. आपल्याकडे ज्या भागधारक महिला किंवा कर्ज घेणा-या महिला येतात. त्यांना जास्तीत जास्त कर्ज पुरवठा कसा होईल? आपल्याला याबाबत मार्गदर्शन करायचे असेल तर बँकांची मिटींग बोलवावी लागेल.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये दोन भाग आहेत. पहिला भाग म्हणजे या महिलांना सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत प्राधान्य दिले जाते.

**प्रभात पाटील :-**

आपल्याकडून हे सगळे प्रस्ताव बँकांकडे जातात. परंतू, आपल्याला बँका कर्ज देत नाही.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला बँका कर्ज वाटप करतात.

**प्रभात पाटील :-**

आमच्या एवढे दिवसाच्या अंदाजावरून मी सांगते की बँका कर्ज वाटप करित नाही.

**मोहन पाटील :-**

बँका कर्ज वाटप करित नाही हा वेगळा विषय आहे. काही लोक रिपेमेंन्ट करतात. परंतू, बँक ते कर्ज मंजूर करत नाही.

**प्रभात पाटील :-**

बँक कर्ज मंजुर करित नाही ही एक वास्तविकता आहे. मी तुम्हाला त्याच्यासाठी बोलते की तुम्ही बँकांशी संपर्क साधा. माझा आतापर्यंत तीन वर्षाचा अनुभव आहे की, हा रू. ३५ लाखाचा निधी खर्च होत नाही आपण त्या निधीबाबत काही प्रकरणांना अजुनपर्यंत शासन मान्यता घेत नाही. आपण या निधीची तरतुद करतो. आपल्या बजेटमध्ये या निधीची तरतूद केलेली आहे. परंतू, आपल्याला खर्चाचे अधिकार नाहीत त्याच्यामुळे महिला व बालकल्याण समितीचे क्षेत्र फार लिमिटेड राहीलेले आहे. तूम्ही याबाबत निवेदन करा.

**एस. ए. खान :-**

बँकाच सांगतात की, लोक मागचे कर्ज पूर्ण भरत नाही. म्हणून आम्ही नविन लोकांना कर्ज देत नाही. मी बँकेत गेलो होतो तेव्हा त्यांनी सांगितले की, आमच्याकडे अजुनपर्यंत काही लोकांची मागच्यावेळेची थकबाकी राहिलेली आहे. म्हणून आम्ही या लोकांना कर्ज देत नाही ती काही चूक नाही.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, माझे मित्र सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी माजी मा. सभापतींवर जो आरोप केलेला आहे. मी त्याबाबत असे सांगेन की, कदाचीत त्यांचे हे पहिलेच बजेट असेल. त्यांना बजेटची कल्पना नसेल. कारण ते फक्त घरचे बजेट करत असतील. सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले की, हे फुगवलेले बजेट आहे. परंतु, हे फुगवलेले बजेट नाही ही स्थायी समिती महानगरपालिकेचे ह्रदय आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठिकाणी सगळे रेकॉर्ड दिलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

आता आयुक्त साहेबांनी जे सुचविलेले आहे त्याची जबाबदारी स्थायी समितीची सूद्धा असते. आपण आपल्या कर्मचा-यांकडून काम करून घ्यावे लागते. ज्या काही उत्पन्नाच्या वगैरे बाजू दिलेल्या असतात त्या वाढवायचे काम त्यांचे असते. स्थायी समिती फक्त काम सुचविते. आज या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, मा. आयुक्त साहेबांनी जे इष्टांक दिलेले आहेत ते इष्टांक काही डिपार्टमेन्टने पूर्ण केलेले नाहीत. या डिपार्टमेंन्टच्या ऑफीसरने त्याबाबतीत काहीही लक्ष दिलेले नाही. त्या ऑफीसरने स्थायी समितीला याबाबतीत काहीही कळवलेले नाही. आता त्या डिपार्टमेंन्ट मध्ये काय वसुली चालते, काय नाही हे बघणे त्यांचे काम काम आहे. ही माहिती स्थायी समितीला दर तीन महिन्यानंतर द्यावी लागते. ती माहिती दिलेली नाही. त्यांनी मा. आयुक्त साहेबांचा इष्टांक पूर्ण केलेला नाही तुम्ही याबाबत कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. ज्या डिपार्टमेन्टच इष्टांक पुर्ण नसेल तुम्ही त्यांच्यावर कडक शासन केले पाहिजे अशी माझी तुम्हाला विनंती आहे तुम्ही कडक शासन कराल अशी माझी खात्री आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला खुलासा करण्याची आवश्यकता नाही आम्ही पूर्णपणे बोलू शकतो.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील तुम्ही घरचे बजेट असे का बोलतात? हे बजेट तुमच्यासमोर सादर केलेले आहे. तुम्ही असे कशाला बोलले? तुम्ही तुमचे शब्द मागे घ्या. तुम्ही आम्हाला याबाबतचा खुलासा करणे गरजेचे आहे. आम्ही या ठिकाणी घरचे बजेट सादर करण्यासाठी बसलेलो नाही.

**गजानन भोईर :-**

आम्ही बोलताना व्यवस्थित बोलतो. तुम्ही जसे बोलता तसे आम्हालासुद्धा बोलता येते. बोलताना थोडा विचार करून बोलावे.

**मोहन पाटील :-**

घरचे बजेट हे शब्द मागे घेण्यात यावेत.

**मिलन पाटील :-**

घरचे बजेट हे शब्द मागे घेतले जातील.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील हे घरच्या बजेटबाबत जे काही बोलले ते शब्द मागे घेतलेले आहेत.

**मोहन पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांची बजेटवर चर्चा होणार आहे. आपण अधिकाऱ्यांकडून जी काही कामे करून घेतो ती कामे करित असताना आम्हाला अधिकाऱ्यांकडून काही वेळेला अकार्यक्षमता मिळते. आम्ही तरिसूद्धा कामे करून घेतो. परंतू, त्यांच्या प्रमोशनची सुद्धा कामे आहेत. साहेब, तुम्ही आल्यापासून अधिकाऱ्यांच्या मागे आहेत. तुम्ही अधिकाऱ्यांना प्रमोशन दिलेले नाही. तुम्ही बजेटच्या विषयामध्ये ती प्रमोशनसुद्धा काढून टाका. तुमच्याकडे भार आहे, कायदे आहेत. तूमच्याकडे काही अडचणी आहेत. इकडचा एकूण एक सदस्य तूम्हाला पोटतिडकीने बोलत असतो की, तुम्ही प्रमोशन कुठल्याही प्रकारे करून घ्या. म्हणजे या बजेटबरोबर अधिकाऱ्यांचे प्रमोशन झाले पाहिजे असे सर्व सन्मा. सदस्य बोलत असतात. आम्ही मागच्या वेळेला सेवा नियम सादर करताना कुठलाही विचार केलेला नव्हता. एकाही सन्मा. सदस्यांने असा सेवा नियम का दिला? असे विचारलेले नाही. आम्ही या सन्मा. सदस्यांच्या भावना मारलेल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत या अधिकाऱ्याचे सेवा नियमात प्रमोशन झाले पाहिजे अशी आमची सदिच्छा होती. बाकी आमचा काहीही विरोध नव्हता. प्रत्येंक पालिकेत मोठ्याप्रमाणावर राजकारण चालते. परंतु, ही एकमेव अशी महानगरपालिका आहे की या महानगरपालिकेचे काम म्हणजेच आमचे राजकारण आहे. त्यांना प्रमोशन, उन्नती हेच आमचे राजकारण आहे. आम्ही दुसरे राजकारण केलेले नाही. मी सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने तुम्हाला विनम्रपणे प्रार्थना करतो की, आपण कुठल्याही तऱ्हेने या बजेटबरोबर अधिकाऱ्यांचे प्रमोशन करावे अशी विनंती आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१२ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००५-०६ चे सुधारित व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक मा. आयुक्तसाहेबांनी स्थायी समितीच्या मा. सभापतींना सादर केलेले आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब मी हे बजेट स्विकारलेले आहे. या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महानगरपालिका अधिकारी वर्ग आणि महानगरपालिका कर्मचारी वर्ग अपणा सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहीर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.०५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**